# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

दैनिक ऐक्य, सातारा.



सतार वादन करताना अर्जुन वर्मा, तबल्यावर उन्मेष बॅनर्जी.

# पाटणमध्ये अर्जुन वर्मा यांच्या सतारवादनाने रसिक मंत्रमुग्ध

**पाटण**, दि. १३ : जागतिक कीर्तीचे सुप्रसिद्ध युवा सतारवादक अर्जुन वर्मा यांच्या अद्वितीय सतारवादनाची सुरेल मैफल पाटण येथील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सभागृहात रंगली. अवघ्या काही क्षणातच त्यांच्या स्वरसाधनेने उपस्थित संगीतप्रेमी अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. प्रेक्षकांनी जोरदार टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त दाद दिली.

कार्यक्रमास चौगले इंडस्ट्रीजचे चेअरमन विजय चौगले, कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, संचालक याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, पृथ्वीराज पाटील, जॉइंट सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

अर्जुन वर्मा यांनी आपल्या मैफलीची सुरुवात राग भीमपलाशने केली. त्यानंतर त्यांनी एकापाठोपाठ अनेक रागांची मैफल सजवत अखेरीस राग दुर्गेश्वरीने कार्यक्रमाची सांगता केली. सूर आणि ताल यांच्या सुंदर मेळाव्याने सभागृहात एक वेगळेच चैतन्य पसरले. प्रत्येक तारेला छेडताना उमटणारे स्वर श्रोत्यांच्या मनावर आनंदाच्या लहरी निर्माण करत होते.

अर्जुन वर्मा यांची सतार आणि उन्मेष बॅनर्जी यांच्या तबल्याच्या जुगलबंदीने कार्यक्रमाला विशेष उंची लाभली. तबल्याच्या संगतीत रंगलेली ही शास्त्रीय मैफल रसिकांसाठी अविस्मरणीय ठरली. पाटणच्या दर्दी प्रेक्षकांनी या कलाकारांचे मनापासून स्वागत करत टाळ्यांच्या कडकडाटात भरभरून दाद दिली. सचिन रणदिवे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. पौर्णिमा मोरे यांनी आभार मानले. कार्यक्रमास पाटण शहरातील आणि परिसरातील संगीत रसिक उपस्थित होते.